महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
Email id :- mscepune@gmail.com फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२२/ 6309
दिनांक :- 30 /१२/२०२२

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालक,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र (जीसीसी) परीक्षा जुलै - २०२२
निकाल प्रमाणपत्र विद्यार्थी पूर्व-अट तपासणी करुनच देणेबाबत.

संदर्भ :- १) अधिनियमावली १९९१ सुधारित आवृत्ती २०१६.
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण -२०१६/प्र.क्र.११/एसडी - २, दि.२४/०४/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सत्र जाने २०२२ ते जुन २०२२ या सत्रातील उमेदवारांना आपण पूर्व-अट तपासणी करुनच प्रवेश दिला असेल,असे गृहित धरुन व आपण केलेल्या शिफारशीनुसार सदर विद्यार्थ्यांची परीक्षा दि.२६/०७/२०२२ ते दि.३०/०७/२०२२ या कालावधीत घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल दि.०९ नोव्हेंबर २०२२ रोजी ऑनलाईन जाहिर करण्यात आलेला आहे. या निकालानुसार जे उमेदवार उत्तीर्ण झाले त्यांचे निकाल प्रमाणपत्र आपणांस पाठविण्यात येत आहे. हे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वितरित करताना विद्यार्थ्यांची पूर्व-अट तपासणी करुन घ्यावी.

टंकलेखन व लघुलेखन सत्र प्रवेश प्रसंगी विद्यार्थ्याने संदर्भिय शासन परिपत्रक क्र.२ नुसार पूर्व-अट पात्रता पूर्ण केली किंवा नाही हे पडताळून पाहणेची जबाबदारी प्राचार्य व संस्थाचालक मान्यता प्राप्त टंकलेखन व लघुलेखन संस्था यांची आहे.

तथापि, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे कि, विद्यार्थ्याला प्रवेश देताना पूर्व-अट न तपासता प्रवेश दिला जातो.ही बाब अत्यंत गंभीर आहे.

जे विद्यार्थी पूर्व-अट पात्र धारक नाहीत,अशा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करु नये. तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

सर्व प्रमाणपत्र वितरित झाल्यानंतर संस्थांचालकांनी पूर्व-अट तपासणी करुन प्रमाणपत्र वितरित केलेबाबतची पोहोच या कार्यालयास दि.२०/०१/२०२३ पर्यंत पाठवावी.

(शैलजा दराडे) 30/12/2022
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

प्रत माहितीस्तव :

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.सर्व.
३) शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई (उ/द/प).